# महाराष्ट्र शासन

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय , बारामती, जि. पुणे.

प्लॉट नं.पी.107, एम.आय.डी.सी. आवार, महिला रुग्णालया समोर, बारामती, जि. पुणे. पिन नं. 413133.
EMAIL ID- DEANGMCBARAMATI@GMAIL.COM WEBSITE : www.gmcbaramati.org


जा.क्र.पुअहोशावैमबा/अका/ ५९८/२०२६ दिनांक : २१/०७/२०२६

प्रति,
मा.आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय : महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जयंतीनिमित्त आयोजित आरोग्य तपासणी व विशेष आरोग्य शिबिर अभियानांतर्गत दिनांक २०/०७/२०२६ रोजी आयोजित उपक्रमांचा दुसरा दिवसाचा अहवाल.

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, दिनांक २० जुलै २०२६ रोजी आयोजित नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा दुसरा दिवस यशस्वीरीत्या पार पडला. शिबिरामध्ये नेत्ररोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी, आवश्यक पूर्वतपासण्या व शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच एस.एम.एम. आय वेल्फेअर ट्रस्ट यांच्या सहकार्याने व डॉ. विकास महात्मे यांच्या मार्गदर्शनाखाली मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी एकूण ८० मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. सर्व शस्त्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनुभवी नेत्ररोग तज्ज्ञ व वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत सुरक्षितरीत्या करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर सर्व रुग्णांची आवश्यक तपासणी करून त्यांना औषधे, डोळ्यांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन तसेच पुढील फॉलो-अपसाठी सूचना देण्यात आल्या.

या शिबिरामुळे बारामती व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा विनामूल्य उपलब्ध झाली असून नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक, नेत्ररोग विभाग, भूल विभाग, परिचारिका, तंत्रज्ञ, रुग्णालय प्रशासन तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

Scanned with OKEN Scanner

दिवस २ ठळक बाबी :

- शस्त्रक्रिया दिनांक : २० जुलै २०२६
- शिबिर : नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर
- एकूण यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया : १०० (१९ व २० जुलै २०२६)
- सर्व रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधे, समुपदेशन व फॉलो-अप सूचना देण्यात आल्या.

सदर अहवाल मा. आयुक्त यांच्या माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.

21/7/26

अधिष्ठाता,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती

प्रत - मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner